जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JUL 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'संवाद' एक नवा उद्योग

व्यक्ती हा समाजशील प्राणी आहे. एकमेकांच्या संपर्कात असल्याशिवाय आपण जगू शकत नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती असल्या तरी



'संवाद' हा आपला स्थायी भाव आहे. जगातल्या औदयोगिक क्रांतीनंतर, दोन जागतिक महायुद्धे, जागतिकीकरण या सर्व बदलांमध्ये समाजमन कमालीचे बदलले आहे. ही अस्वस्थता टिपण्याचे, रेखाटण्याचे कार्य साहित्यकारांनी, कलाकारांना त्या-त्या वेळी केलेले आहेच. आजच्या ख-या अर्थाने भौतिक सुखाच्या पाठीमागे जाणारी माणसे बघताना, माणूस-माणसापासून लांब जात आहे, ही अस्वस्थता आपल्या मना-मनांमध्ये आहे. काय होणार या नवीन पिढीचे हा रोजचाच प्रश्न उपस्थित होत आहे.

विभक्त कुटंबे, टोकाचे स्वातंत्र्य, स्वत:पुरते जगण्याच्या कल्पना यामुळे कोणाचीच जबाबदारी नको ? ही भूमिका घेतली जात आहे. अशा परिस्थितीत घरातील वृद्ध व्यक्ती, रूग्ण यांना सांभाळायचे कोणी ? हा प्रश्न आहे. काही घरांतील प्रत्येक व्यक्ती ही कामात आहेत अशावेळी, खरोखरच ज्यांना माणसांची गरज आहे, अशांना काही तासांसाठी सेवा देणे, अशा नवीन रोजगारांची बातमी वाचली. भविष्यात जे घडणार आहे, याची कल्पना करताना, ते प्रत्यक्षात घडताना, जो धक्का बसतो तो पचविण्याची येथून पुढे तयारी करावी लागणार हे निश्चितच आहे.

दुस-या महायुध्दानंतर तुम्ही एकटे आहात का? तर चर्च मध्ये या ! अशा जाहिराती करण्यात आल्या. ज्यांचे संपूर्ण कुटंब युद्धामध्ये बळी गेलेले आहेत, कमालीचा एकटेपणा, हरवलेपणा, भकास जीवन यातून सावरण्यासाठी या जाहिराती महत्वाच्या ठरल्या. रशियाचे विघटन झाल्यानंतर तेथील साम्यवाद संपुष्टात आला आणि एक प्रकारचा मोकळेपणा समाजात आला. याचा वाईट परिणाम म्हणून उघडपणे वृत्तपत्रांत महिलांच्या संपर्काचे तपशील प्रकाशित झाले होते.. अर्थात यावर टीकाही तेवढीच झाली. मध्ये एकदा घरातील वृद्ध व्यक्तीला वृत्तपत्र वाचून देण्यासाठी माणूस पाहिजे, अशा जाहिरात करण्यात आल्या. अर्थात ज्यांच्या घरात, कुटूंबसंख्या कमी आहे किंवा आहेत ती आपल्या व्यवसायात आहेत, अशावेळी देखरेख करण्यासाठी व्यक्तीची गरज असतेच. म्हणजे थोडक्यात चांगल्या पद्धतीने देखभाल करणा-या पण विश्वासू असलेल्या व्यक्तीची गरज येथून पुढे निर्माण होणार आहे, हे यातूनच लक्षात येते. माणूस हा माणसांसाठी, त्यांच्या संपर्कासाठी ह्युमन हिलिंग ज्याला म्हणता येईल अशा संपर्कासाठी आसुरलेला असतो, हे खरे आहे. एका परप्रांतिय आजींनी आपल्या भाषेत अर्धा तास दुस-या व्यक्तीला, आपली भाषा समजणार नाही हे माहित असून आपल्या मनात साचलेले विचार व्यक्त केले. कोणीतरी बोलण्यासाठी, कंपनी देण्यासाठी, सेवा करण्यासाठी, देखभाल करण्यासाठी व्यक्ती पाहिजे असतो. अशा परिस्थितीत काही तासांसाठी मित्र-मैत्रिण,लग्नांसमारंभासाठी प्रोफेशनल ब्राइडमेडस, आइस्क्रिम टेस्टर, व्यावसायिक कंपन्यांसाठी त्यांच्या गरजेप्रमाणे म्हणजेच जलपरी होणे वेगैरे अशा स्वरूपाच्या काही तासांच्या रोजगारांची निर्मिती होत असल्याचे वाचून आश्चर्य वाटावे, असा हा ह्युमन हिलिंगचा उदयोग पुढे येत आहे.

प्रिटी वुमन या इंग्रजी चित्रपटात अत्यंत यशस्वी असलेल्या व्यावसायिक व्यक्तीला एक महिलेच्या कंपनीची, सोबत असण्याची गरज यावरून हा चित्रपट पुढे सरकतो. बदलत्या जगात मानवी संवादाला कोणताही पर्याय आणला तरी तो उपयोगी ठरणार नाही. पंढरपुरच्या वारीमधले वारकरी, त्यांचे आपसातले नाते बघितले तर पाश्चिमात्य संस्कृतीचा अवंलब करणारे, महानगरात, शहरात राहणारे आपण संवादापासून नेमके किती दूर जात आहोत ते डोळसपणे तपासण्याची आवश्यकता आहे.

● डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com